# शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 13.08.1985, दिनांक 5.02.2004 |
| ३ | योजनेचे स्वरूप | राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एच.डी. करता यावी. या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आलेली आहे.<br>सदर योजनेसाठी खालीलप्रमाणे 14 संच मंजूर आहेत.<br>**अ क्र / शासकीय संस्था / महाविद्यालयाचे नांव / संच**<br>01 शासकीय विज्ञान संस्था मुंबई – 03<br>02 शासकीय विज्ञान संस्था नागपूर – 03<br>03 शासकीय विज्ञान संस्था औरंगाबाद – 03<br>04 शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती – 01<br>05 वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर – 01<br>06 राज्यातील अकृषी विद्यापीठे व सल्गिनत महाविद्यालये यामधील विद्यार्थांसाठी – 03<br>**एकूण** – 14 |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एच.डी. करता यावी. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी योजना लागू आहे. |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. संबंधित छात्र कोठेही सेवेत नसावा. तसेच इतर कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन स्विकारता येणार नाही.<br>३. संबंधित विद्यार्थ्याने पीएच.डी. साठी विद्यापीठामध्ये रीतसर नोंदणी करून संबंधित मार्गदर्शकाने शिफारस करणे आवश्यक आहे.<br>४. विद्यार्थ्याने जो विषय निवडला असेल त्या विषयासाठी विद्यापीठाने मान्यता दिलेल्या मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण वेळ संशोधन कार्य करावे लागेल.<br>५. अधिछात्रवृत्तीचा कालावधी 3 वर्षाचा राहिल.<br>६. सदर शिष्यवृत्ती चे राज्य स्तरावर 3 व महाविद्यालयीन स्तरावर 11 संच आहेत.<br>७. या शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादा नाही.<br>८. ज्या विद्यार्थांनी पदवी (बी.ए. / बीएससी / बीएड) आणि पदव्युत्तर (एम.ए. / एमएससी / एम.एड.) यापैकी कोणत्याही एका पदवी परीक्षेत किमान 60 टक्के (प्रथम श्रेणी ) गुण प्राप्त केले आहेत व अन्य पदवी परीक्षेत 55 टक्के (द्वितीय श्रेणी ) गुण प्राप्त केली आहेत, असे विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.<br>तथापि एखाद्या वर्षी वरील अट पूर्ण करणारे विद्यार्थी उपलब्ध नसतील तर त्या वर्षी ज्या विद्यार्थाने पदवी व पदव्युत्तर स्तरावर द्वितीय श्रेणी (55 टक्के) गुण प्राप्त केली आहे असे विद्यार्थी पात्र समजले जातील. |

| | | |
|---|---|---|
| | | ९. सदर शिष्यवृत्ती साठी केवळ (बी.ए. / बीएससी / बीएड) आणि पदव्युत्तर (एम.ए. / एमएससी / एम.एड.) हे अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले विद्यार्थीच अर्ज करू शकतात.<br>१०. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>११. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यत चालू राहतील.<br>१२. नूतनीकरनासाठी विद्यार्थ्याने मागील वर्षीच्या अर्जाच्या Application ID चा उपयोग करावा. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२. मार्गदर्शकासाठी विद्यापीठाचे मान्यता पत्र.<br>३. पीएच.डी. मार्गदर्शक यांचे, विद्यार्थी त्यांचेकडे पीएच.डी. करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र.<br>४. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम गुणपत्रिका.<br>५. नूतनीकरणासाठी मागील वर्षाचा मार्गदर्शकाने दिलेला प्रगती अहवाल. |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यास प्रतिवर्ष 9000/- व रु 1000/- वार्षिक सादीलवार खर्च हे लाभ देण्यात येतात. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |